# महाराष्ट्र विधानसभा नियमांन्वये अध्यक्षांनी दिलेले निदेश

## पुनरीक्षित निदेश क्रमांक १* सभागृहाच्या कामकाजाचा पारस्पारिक प्राथम्यक्रम

दिनांक १९ सप्टेंबर, १९६३ रोजी दिलेला निदेश क्रमांक १ रद्द करुन महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम ५८ च्या तरतुदींनुसार अध्यक्षांनी खालील निदेश दिला आहे :-

अध्यक्षांनी अन्यथा निदेश दिला नसेल तर, सभागृहासमोर असलेल्या व खाली निर्दिष्ट केलेल्या निरनिराळया प्रकारच्या कामांचा पारस्पारिक प्राथम्यक्रम पुढील क्रमवारीनुसार असेल :-

(एक) : शपथ घेणे किंवा गांभीर्यपूर्वक दृढकथन करणे.

(दोन) : प्रश्न (अल्पसूचना प्रश्नांसह).

(तीन) : राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

(चार) : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव.

(पाच) : मंत्र्यांचा परिचय.

(सहा) : अभिनंदनपर प्रस्ताव.

(सात) : शोक प्रस्ताव.

(आठ) : अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे.

(नऊ) : सभागृहाच्या पटलावर ठेवावयाची कागदपत्रे.

(दहा) पुरवणी मागण्या सादर करणे.

(अकरा) : अतिरिक्त मागण्या सादर करणे.

(बारा) : राज्यपालांकडून आलेले संदेश कळविणे.

(तेरा) : विधानपरिषदेकडून आलेले संदेश कळविणे.

(चौदा) : विधेयकांना राष्ट्रपतींची अधिसंमती मिळाल्याबद्दलची सूचना.

(पंधरा) : विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाल्याबद्दलची सूचना.

(सोळा) : सभागृहाच्या सदस्यांची अटक, स्थानबध्दता, किंवा सुटका, याबाबत दंडाधिकारी किंवा इतर प्राधिका-यांकडून आलेले संदेश.

(सतरा) : विविध समित्यांचे अहवाल सादर करणे.

(अठरा) : अशासकीय विधेयके व ठराव यासंबंधीच्या समितीचे प्रतिवृत्त सादर करणे व त्यास संमती देण्याबाबतचा प्रस्ताव.

(एकोणीस) : कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सादर करणे व समितीच्या शिफारशी स्वीकृत करण्याबाबतचा प्रस्ताव.

(वीस) : महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम १८१ अन्वये समितीपुढे सादर करण्यात आलेला पुरावा सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

| | | |
|---|---|---|
| (एकवीस) | : | विनंती-अर्ज सादर करणे. |
| (बावीस) | : | विशेषाधिकार भंगाचे प्रश्न. |
| (तेवीस) | : | नियम ९७ अन्वये प्रस्ताव (स्थगन प्रस्ताव). |
| (चोवीस) | : | लक्षवेधी सूचना. |
| (पंचवीस) | : | पुरवणी मागण्यांवर चर्चा. |
| (सव्वीस) | : | अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा. |
| (सत्तावीस) | : | अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान. |
| (अठ्ठावीस) | : | अतिरिक्त मागण्यांवर चर्चा. |
| (एकोणतीस) | : | सभागृहाच्या बैठकीस सदस्यांना अनुपस्थित राहण्याची परवानगी देण्यासंबंधीची अध्यक्षांची घोषणा. |
| (तीस) | : | सभागृहातील सदस्यांचे राजीनामे, सभाध्यक्ष-तालिकेवर नामनिर्देशन, समित्या, इत्यादींसारख्या विविध विषयांसंबंधी अध्यक्षांची घोषणा. |
| (एकतीस) | : | अध्यक्षांनी दिलेले निर्णय किंवा केलेल्या घोषणा. |
| (बत्तीस) | : | म.वि.स.नियम ४७ अन्वये मंत्रीमहोदयांचे निवेदन. |
| (तेहतीस) | : | म.वि.स. नियम ४८ अन्वये सदस्यांचे वैयक्तिक निवेदन. |
| (चौतीस) | : | माजी मंत्र्यांनी आपल्या राजीनाम्यांच्या स्पष्टीकरणार्थ केलेले वैयक्तिक निवेदन. |
| (पस्तीस) | | विधेयकासंबंधातील चिकित्सा/संयुक्त समितीचा व विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करण्याकरिता मुदतवाढीसंबंधीचा प्रस्ताव. |
| (छत्तीस) | : | अध्यक्षांना/उपाध्यक्षांना त्यांच्या पदावरुन दूर करण्यासंबंधीचा प्रस्ताव मांडण्याची परवानगी मिळण्यासंबंधीचा प्रस्ताव. |
| (सदतीस) | : | मंत्रीमंडळावर अविश्वास व्यक्त करण्यासंबंधीचा प्रस्ताव मांडण्याची परवानगी मिळण्यासंबंधीचा प्रस्ताव. |
| (अडतीस) | : | अल्पकालीन चर्चा. |
| (एकोणचाळीस) | : | विशेष हक्क समितीच्या अहवालावर विचार करणे. |
| (चाळीस) | : | विधेयके किंवा अहवाल/वैधानिक प्रस्ताव, अनियत-दिन प्रस्ताव, अंतिम आठवडा प्रस्ताव, इत्यादींसारखे प्रस्ताव यावरील चर्चा. |
| (एकेचाळीस) | : | अर्धा-तास चर्चा. |